# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

❖ **मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक ०५ अंतर्गत मिरा रोड स्टेशन परिसरातील अनधिकृत हातगाड्या, गाळे व टपऱ्यांवर तोडक कारवाई**

दिनांक ०६ जानेवारी २०२५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक ०५ अंतर्गत मिरा रोड स्टेशन परिसरातील गाळ्यासमोरील अनधिकृत छपरे, हातगाड्या, अनधिकृत पान टपऱ्यांवर जेसीबीच्या सहाय्याने तोडक कारवाई करण्यात आली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात येत असून गेल्या काही आठवड्यापासून अशी अनधिकृत बांधकामे जमिनदोस्त केली जात आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, उपायुक्त (अतिक्रमण विभाग) कल्पिता पिंपळे यांच्या नेतृत्वाखाली विविध प्रभागातील अनधिकृत बांधकामांचा आढावा घेण्यात आला. यावेळी झालेल्या बैठकीत उपायुक्तांनी सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना त्यांच्या प्रभागातील अनधिकृत बांधकामे, फेरीवाले, गॅरेजेस, पदपथावरील व्यावसायिक, अनधिकृत होर्डिंग्ज, अनधिकृत झोपड्या यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्या पार्श्वभूमीवर दिनांक ०६ जानेवारी २०२५ मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक ०५ अंतर्गत मिरा रोड स्टेशन परिसरात गाळ्यासमोरील अनधिकृत छपरे, हातगाड्या, अनधिकृत पान टपऱ्यांवर कारवाई करण्यात आली. कारवाई दरम्यान ६२ हातगाड्या, अनधिकृतपणे बनवण्यात आलेल्या ०६ गाळ्याच्या समोरील छपऱ्यावर, एक पान टपरी व एक गाला यांच्यावर जेसीबीच्या सहाय्याने अतिक्रमण विभागामार्फत तोडक कारवाई करण्यात आली. सदर कारवाई दरम्यान अतिरिक्त आयुक्त संभाजी पान पट्टे, अतिक्रमण विभागप्रमुख नरेंद्र चव्हाण, सहाय्यक आयुक्त प्रभाग समिती क्रमांक ०५ प्रियांका भोसले, कनिष्ठ अभियंता, अतिक्रमण विभाग कर्मचारी, फेरीवाला पथक, पोलीस व महाराष्ट्र सुरक्षा बलचे जवान उपस्थित होते.